
काजवा

जोआन राइडर

चित्र: डॉन बोलोग्नीस

मराठी: अश्विनी बर्वे



“ही उन्हाळ्यातली एक गरम संध्याकाळ आहे. काजवे हळूहळू पर्ण मैदानात उडायला सुरुवात करतात. ते चमकायला लागतात. त्यांचा प्रकाश एक संकेत आहे.”

या सुंदर पुस्तकात वाचकांना काजव्याच्या जीवनाबद्दल समजेल. काजव्याच्या जन्मापासून ते वयस्कर होण्यापर्यंत, त्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत. ते काय खातात? त्यांचे शत्रू आणि त्यांच्या प्रकाशाचा अर्थ याबद्दल त्यांना समजेल.

सुंदर चित्रांमुळे काजव्याचे जग अजूनच आकर्षक वाटेल.

काजवा



जोआन राइडर

चित्र: डॉन बोलोग्नीस

मराठी: अश्विनी बर्वे



अंधारात मैदानात पिवळ्या रंगाचा प्रकाश चमकत असतो. एक नर बीटल /काजवा तिथे जात असतो. तो एका छोट्या किड्या सारखा दिसतो.

पण त्याच्या पोटाखालून छोटासा प्रकाश दिसतो. त्याला काजवा म्हणतात.



काजवा जमिनीवर बीळ बनवतो.
तो अन्नाचा शोध करत आहे.
अंधारात तो आपल्या अँटीनाने
रस्ता शोधतो.

त्याचा अँटिना पातळ मुळांना स्पर्श
करतात. काजवा तिथून निघून
जातो.तो मुळांना खात नाही.

तो रोपं खात नाही.

काजव्याच्या मागे थोडीशी माती खाली पडली आणि तो एका मोठ्या खड्ड्यात पडला. त्याच्यावर माती पडते.पण तो आपले डोके कठोर पाठीच्या मागे खेचतो.

त्याला जखम होत नाही. खड्ड्यात त्याची अँटिना हळूवार हलते. त्याला तिथे काहीतरी हलतांना दिसते तिथे एक घूस येतांना दिसते.



काजवा एक छोटा खड्डा शोधतो आणि तिथे तो आराम करतो. घूस जवळच तो तिथे आराम करतो.



तिथे त्याला काही गांडूळाचा गंध येतो. घूस तिथे थांबते आणि त्यांना खाते.

तोपर्यंत काजवा निघून जातो.



काजव्याची अँटिना एका गुळगुळीत आणि जिवित वस्तूला स्पर्श करते. ते एक छोटे गांडूळ आहे. एका दुसऱ्या काजव्याला पण त्याला खायचे आहे. गांडूळ पळायला बघते,पण काजवा आपल्या मजबूत जबड्याने त्याला चावतो, परत परत चावतो. प्रत्येकवेळी चावतांना तो गांडूळाच्या शरीरात विष भरतो.

लवकरच गांडूळ हलू शकत नाही. विषामुळे गांडूळाचे कोमल शरीर अजून नरम होते. मग काजवा त्याला खाऊ शकतो.





काजवा आता पूर्ण विकसित झालेला आहे. तो जवळपास दोन वर्षे जमिनीच्या खाली राहिला आहे. जेव्हा तो मोठा होतो तेव्हा त्याला विकसित अशी नवीन त्वचा मिळते आणि त्याची जुनी त्वचा झडून जाते.

वसंताच्या शेवटी काजवा जमिनीत थोडा अधिक खोल जातो. काही दिवसानंतर तो परत आपली त्वचा झाडून टाकतो.



आता तो कोशात गेला
आहे. तो पूर्ण पिवळा
पडला आहे..



त्याचे पंख आणि पाय अशक्त
आहेत. जेव्हा तो आराम करतो
तेव्हा त्याचे शरीर हळूहळू
चमकते.

जवळजवळ दहा दिवसांनतर
त्याची त्वचा फाटून जाते.



मग एक वयस्क भृंग
(बीटल) आवाज करत बाहेर
येतो. आता तो काजवा
झाला आहे.



काजवा जमिनीच्या खाली राहू शकत नाही. तो हवेत आवाज करतो, रात्र झाली आहे, आता खूप उशीर झाला आहे.


काजव्याला चमकण्यासाठी रात्र झाली आहे आणि पाऊसही पडत आहे. आज रात्री तो उडणार नाही. काजवा एका वाळलेल्या फांदीवर आराम करतो.

त्याचे नवीन, लांब अँटिना ओले होतात. तो आपल्या पायांनी ते पुसतो. तो आपले डोके आपल्या पाठीवरच्या ढालीखाली लपवतो.



पंखांच्या आवरणामुळे त्याचे पंख आणि पोटाचे रक्षण होते. त्याच्या पोटाचा मोठा भाग हलकेस पिवळा असतो. त्यात रसायन असतात ज्यामुळे प्रकाश निर्माण होतो. तो एक थंड प्रकाश आहे, असा प्रकाश जो जळत नाही. काजवा आपल्या प्रकाशाला नियंत्रित करू शकतो. कधी चमकायचे आणि कधी नाही.

पहाटे काजवा घासावर पडून राहतो. त्याच्या अँटिना वरखाली हलतात. त्यांना सगळे जाणवते. पण आता काजव्याला आपला रस्ता बघू शकतो.



त्याचे नवीन, मोठे डोळे चमकणारे रंग आणि प्रकाश दिसतो. काजव्याला काहीतरी हलतांना दिसते.

तो आता किड्यांना स्वच्छ पाहू शकतो. पण तो बाजूला वळतो आणि आवाज करत दूर जातो. तो अन्नाच्या शोधात नसतो कदाचित तो आता काही खाणार नाही.







काजवा गवताच्या काडीवर चढतो.
तो उडण्यासाठी तयार आहे. आधी
तो पंख उघडतो, मग त्यांना
पसरवतो आणि झाडात उडून जातो.


दिवसा काजवे लपून बसतात. झाडाखाली एक बेडूक उड्या मारत असतो. बेडूक आपल्या लांब जिभेने एक पतंग पकडतो. पण तो काजव्याला बघत नाही.







उन्हाळ्यातली एक उष्ण संध्याकाळ आहे. आकाश काळे होत जाते, सूर्यास्तानंतर काजवा बाहेर पडतो. तो हळूहळू मैदानामध्ये उडायला सुरुवात करतो, तो चमकू लागतो.





चमकतांना काजवा खालच्या
बाजूने झुकतो आणि मग वरच्या
बाजूला. त्याचे चमकणे फक्त
अर्धा सेकंदापर्यंत राहते. तो प्रकाश
पिवळ्या रंगासारखा चमकतो.



प्रकाश एकप्रकारे संकेत असतो. प्रत्येक
प्रकारचा काजवा आपल्या विशेष
पद्धतीने उडतो आणि आपला संकेत
देतो. लवकरच इतर काजवे सुद्धा
चमकायला लागतात.



काही काजवे त्याच्यासारखेच झुकतात, त्याच्यासारखाच पिवळा रंग चमकतो. इतर काजवे खूप खाली उडतात ते वेगळ्या प्रकारचे आहेत. ते एकाच जागी थांबतात आणि बारीकसा प्रकाशाने ते चमकत असतात.

त्याचा प्रकाश एका छोट्याशा चेंडू सारखा दिसतो. मैदानात उडणारे आणि चमकणारे सर्व काजवे नर आहेत. ते संकेत पाठवत आहेत पण एकमेकांना नाही.



गवतावर काजव्यांची मादी आहे.
ती चमकणारा प्रकाश बघते आणि
गवताच्या काडीवर चढते. आपल्या
प्रजातीतील काजवे संकेत पाठवत नाही
तोपर्यंत त्या वाट बघत राहतात. मग
त्या पण चमकतात.



काजव्याची मादी चमकते आणि खाली उडणारा नर काजवा सुद्‌धा चमकतो..खाली एक मादी त्वरित चमकते, तिचा छोटा संकेत लगेच मिळतो. चुकीचे उत्तर आल्यावर काजवा उडून जातो. पण खाली असणारा नर परत चमकतो. मादी पण लगेच प्रकाशाचा संकेत पाठवते. हा त्याच्यासाठी योग्य संकेत आहे. ते एकाच प्रकारचे काजवे आहेत. ते संभोग करतील.



मादी काजव्यांचा समूह एकसाथ उडतो. नर काजवे त्यांना उडतांना पाहतात. ते पण त्यांच्या बरोबर चमकतात. गवतात एक मादी आहे पण तिच्याजवळ दुसरा नर आधीच पोहचला आहे.





काजवा एका घराच्या जवळ उडतो आहे. तिथे तो एका नर काजव्याला कोळ्याच्या जाळ्यात अडकलेला बघतो. छोटा कोळी काजव्याच्या पायाला चावतो आहे. त्याचे चावणे विषारी आहे. अडकलेला काजवा आपला प्रकाश नियंत्रित करू शकत नाही. तो न थांबता चमकत राहतो.




एक मुलगी काजव्याला उडतांना बघते. संध्याकाळच्या अंधारात दिसणे अवघड आहे. पण जेव्हा तो चमकतो तेव्हा ती काजव्याला पकडते.



मुलीला वाटते की काजव्याची अँटीना तिच्या हाताला स्पर्श करत आहे. तिच्या लक्षात येते की काजव्याचा प्रकाश तिच्या बोटावर पडतो आहे. पण त्याने चटका बसत नाही. काजवा थोड्यावेळ तिच्या बोटावर थांबतो आणि उडून जातो.





अंधार होत आहे आणि वारे वाहू लागले आहे. काजवा इतर काजव्यांना चमकतांना बघतो, ते वेगळ्या प्रजातीतील आहेत. ते संध्याकाळच्या अंधारात उडायला सुरुवात करतात आणि आणि अंधार झाल्यावर खूप उशिरापर्यंत चमकत राहतात. ते आधी उडणाऱ्या काजव्यांपेक्षा मोठे आहेत आणि त्यांचा प्रकाश हिरवा आहे.

काजवा उडतो आणि चमकतो. त्याच्यासारखाच एक नर उडतो आणि चमकतो. खाली एक मादी आपले उत्तर देते आणि चमकते. हा एकदम योग्य संकेत आहे. दोन्ही नर जवळपास उडतात.



पण हवेचा झोका काजव्याला पकडतो आणि त्याला दुसरीकडे उडायला भाग पाडतो. दुसरा नर त्याच्या आधी मादीजवळ पोहचतो.







पण त्या नराने तिला धोका दिला, तो तिच्याबरोबर संभोग करत नाही. तो एक हिरवा प्रकाशाने चमकणारा नर आहे. तो दुसऱ्या माद्यांची नक्कल करू शकतो. तो इतरांचा संकेत देतो. म्हणून तो नर जेव्हा येतो तेव्हा तो त्याला खाऊन टाकतो.


रात्री अजूनही काही ठिकाणी पिवळा प्रकाश चमकतो. काही लवकर उडणारे काजव्यांचा संभोग झाला आहे. इतर आराम करत आहेत. ते परत चमकतील. एका संध्याकाळी एक काजवा अजूनही चमकत होता. पण गवतावर अंधार आहे. तो पुढे जातो आणि परत प्रयत्न करतो.



गवतावर एका ठिकाणी काजव्याचा प्रकाश त्याला दिसतो. दोन सेकंदानंतर परत त्याला प्रकाश चमकतांना दिसतो. मादी चमकत असते हा एक योग्य संकेत असतो.



तो मादीजवळ जाण्याचा प्रयत्न करतो पण हवेमुळे तो लांब उडून जातो. गवतावर तो चमकतो. तो आपल्या अँटिना हलवतो. तो स्थिर उभा राहतो आणि बघतो. मादी परत प्रकाश दाखवत असते. तिचा प्रकाश खूप छोटा आहे. पण ती आपले पोट वळवते ज्याने तिचा प्रकाश चमकेल.



तो वळतो आणि तिच्याकडे आवाज करत राहतो. तो परत चमकतो. मादी त्याच्या प्रकाशाची वाट बघते. त्यामुळे ती जवळ येते. तिला वास येत नाही, आवाज येत नाही. पण ती प्रकाश बघू शकते. ती त्याच्या प्रकाशाचा पाठलाग करते. जोपर्यंत ती पोहचत नाही तो आवाज करत राहतो.

ती त्याला स्पर्श करते आणि मग ते संभोग करतात.







नंतर नर उडून जातो, त्याला आराम करण्यासाठी जागा मिळते. मैदानावरचे सगळ्या काजव्यांसारखे तो पण काही आठवडे जिवंत राहू शकतो. त्याची जोडीदार गवतात राहते. तिचे शरीर अंड्यानी भरलेले आहे.

काही रात्रीनंतर ती त्यांना जमिनीवर ठेवायला सुरुवात करेल. ती गवताच्या खाली एक एक करून अंडी ठेवते.



जसजसे प्रत्येक अंडे विकसित होते,ते चमकू लागते. प्रत्येकातून काजवा बाहेर येतो.काही आठवड्यात छोटा काजवा अंड्यातून बाहेर येतो आणि तो लगेच भूमिगत होतो.

तिथे तो चमकत राहिल आणि दोन वर्षापर्यंत वाढत राहिल जोपर्यंत त्याचा पूर्ण विकसित काजवा होणार नाही.

समाप्त